**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद)**

**[१९९६] २ एस. सी. आर. १०३५**

**जे. अशोक कुमार**

**- विरुद्ध -**

**स्टेट ऑफ आंध्र प्रदेश आणि इतर**

**२३ फेब्रुवारी १९९६**

**[न्यायमूर्ति के. रामास्वामी आणि न्यायमूर्ती जी. बी. पटनायक]**

*सेवा अधिनियम :*

*ए. पी. उत्पादन शुल्क नियम.*

*गट १ सेवेसाठी निवड - सरळ सेवा भरती - सहाय्यक उत्पादन शुल्क अधीक्षक - एन. सी. सी. उमेदवारांना ५ टक्के गुणांची सवलत - एन. सी. सी. पात्रता असलेल्या उमेदवाराला सवलत दिल्या गेली नाही - न्यायधिकरणाने त्याची याचिका फेटाळली - असा निर्णय दिला की उमेदवार पात्र आहे आणि त्याला सवलत द्यायला हवी होती - मात्र निवड आधीच संपली असल्याने आणि नियुक्त्या झाल्या असल्याने, याचिकाकर्त्याला अनुतोष दिला गेला नाही.*

दिवाणी अपीलीय अधिकारिता : अपील दाखल करण्यासाठी विशेष अनुमत (प्र.) क्रमांक १४९२/१९९४.

ओ. ए. क्रमांक १७६९८/१९९१ मधील आंध्र प्रदेश प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या दिनांक २.८.९३ रोजीच्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून.

याचिकाकर्त्यांसाठी, एल. एन. राव आणि आर. पी. सिंग.

न्यायालयाचा खालील आदेश देण्यात आलाः

याचिकाकर्त्याचे वकील श्री. एल. एन. राव यांनी असा युक्तिवाद केला की, ए. पी. उत्पादन शुल्क सेवा नियमांच्या नियम ४, जीओ. एमएस क्रमांक ११३६, दिनांक १३ सप्टेंबर १९८६ अंतर्गत एन. सी. सी. उमेदवाराला निवडीसाठी ५ टक्के गुणांची सवलत देण्यात आली होती आणि याचिकाकर्ते सरळ सेवा भरतीद्वारे सहाय्यक उत्पादन शुल्क अधीक्षक, गट १ सेवेच्या पदासाठी हजर झाले होते. त्याला ५ टक्के गुण मिळायला हवे होते आणि न्यायाधिकरणाने त्याची याचिका खारीज करून अन्याय केला. आम्हाला त्याच्या

युक्तिवादात बळ दिसून आले. सरळ सेवा भरतीसाठी देखील निवडीसाठी उपस्थित असलेला कोणताही उमेदवार एनसीसी पात्रता असलेल्या उमेदवाराला प्रदान केलेल्या सवलतीसाठी विचारात घेण्यास पात्र असेल. परंतु निवड आधीच संपली असल्याने आणि उमेदवारांची निवड आणि नियुक्ती झाल्यामुळे आम्ही याचिकाकर्त्याला लाभ देऊ शकत नाही.

त्यानुसार विशेष अनुमत याचिका खारीज करण्यात येते.

याचिका खारीज करण्यात आली.

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".